# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. १८-२२

(विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीतील बैठका)

**दिनांक : २४ फेब्रुवारी ते १४ मार्च २०२०**

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण | निर्णयांची संख्या |
|---|---|---|---|
| १८ | २७ फेब्रुवारी | विधानभवन, मुंबई | २ |
| १९ | ५ मार्च | विधानभवन, मुंबई | ६ |
| २० | ६ मार्च | विधानभवन, मुंबई | -- |
| २१ | ११ मार्च | विधानभवन, मुंबई | १ |
| २२ | १२ मार्च | विधानभवन, मुंबई | १ |
| | | एकूण | १० |

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि.२७ फेब्रुवारी २०२०
# (एकूण निर्णय-२)

दि.२७ फेब्रुवारी, २०२०
ग्रामविकास विभाग

## स्मार्ट ग्राम योजनेचे
## आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार असे नामांतर

राज्याच्या ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या स्मार्ट ग्राम योजनेस ‑आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना॰ असे नाव देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

ग्रामविकास विभागाकडून नोव्हेंबर २०१६ पासून राबविण्यात येत असलेल्या स्मार्ट ग्राम योजनेंतर्गत ग्रामपंचायतींना तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय स्मार्ट ग्राम पुरस्कार देण्यात येतात. ही योजना आता ‑आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना॰ म्हणून राबविली जाईल. माजी उपमुख्यमंत्री आर. आर. (आबा) पाटील यांनी ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. तसेच त्यांनी राज्यात ग्रामस्वच्छता अभियान आणि महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजना सुरु करुन त्या प्रभावीपणे राबविल्या. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन स्मार्ट ग्राम योजनेस त्यांचे नाव देण्यात आले आहे.

-----०-----

इतर मागासवर्ग विभाग

## बहुजन कल्याण विभागाच्या नावात अंशत: बदलाचा निर्णय
## इतर मागास वर्ग आणि बहुजन कल्याण विभाग असे होणार नामकरण

शासनाच्या बहुजन कल्याण विभागाच्या नावात अंशत: बदल करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. आता या विभागाचे नाव इतर मागास वर्ग आणि बहुजन कल्याण विभाग असे करण्यात आले आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या १२ फेब्रुवारी २०२० रोजी झालेल्या बैठकीत या विभागाचे इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग या विस्तृत नावाऐवजी बहुजन कल्याण विभाग असे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यात आता सुधारणा करण्यात आली आहे.

-----०-----

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि.५ मार्च २०२०
# (एकूण निर्णय-६)

दि.५ मार्च २०२०
उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठासाठी शिक्षकीय पद निर्मितीस मान्यता

गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठात नवीन पद्व्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी शिक्षकीय पद निर्मितीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

गोंडवाना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध होण्यासाठी नवीन सात रोजगाराभिमुख पद्व्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात येत आहेत. या अभ्यासक्रमासाठी आवश्यक ७६०० रुपयांपेक्षा अधिक वेतनश्रेणी असलेल्या (६ व्या वेतनआयोगानुसार) २१ शिक्षकीय पदे निर्माण करण्यास यावेळी मान्यता देण्यात आली. यात प्राध्यापकांची ७ आणि सहयोगी प्राध्यापकांच्या १४ पदांचा समावेश आहे.

-----०-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## पुण्याच्या सिम्बायोसिस स्किल्स ॲण्ड ओपन युनिर्व्हसिटी नावात अंशत: बदलास मान्यता

पुणे येथील सिम्बायोसिस स्किल्स ॲण्ड ओपन युनिर्व्हसिटी या स्वंयअर्थसहाय्यित विद्यापीठाच्या नावातील ओपन शब्द वगळून त्याऐवजी प्रोफेशनल शब्दाचा समावेश करण्यास मंत्रिमंडळाकडून मान्यता देण्यात आली.

या बदलामुळे या विद्यापीठाचे नाव सिम्बायोसिस स्किल्स ॲण्ड प्रोफेशनल युनिर्व्हसिटी, पुणे असे होणार आहे.

-----०-----

**आदिवासी उपयोजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीकरीता स्वतंत्र "अर्थ व लेखा" व "लेखा परीक्षण " कक्ष निर्माण करण्यास मान्यता**

आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी उपयोजनाच्या परिणामकारक अंमलबजावणीकरिता स्वतंत्र "अर्थ व लेखा" व "लेखा परीक्षण " कक्ष निर्माण करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

आदिवासी विकास विभाग दरवर्षी आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात नियतव्यय उपलब्ध करून दिला जातो. त्यानुसार साधारणत:रूपये १० हजार कोटी एवढया निधी वार्षिक नियोजन, वाटप व संनियंत्रण आणि विभागाकडील योजनांची अंमलबजावणी आदिवासी विकास विभागामार्फत करण्यात येते. आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी विकास विभागाच्या तसेच इतर प्रशासकीय विभागांच्या विविध कल्याणकारी योजनांचा समावेश असतो.

आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त विविध यंत्रणामार्फत योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करणे व त्या अंतर्गत होणारा खर्च हा आर्थिक शिस्तीस अनुसरून होण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीत स्वतंत्र "अर्थ व लेखा" (Budget & Account) आणि "लेखा परिक्षण "Audit) कक्ष निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे . याअंतर्गत ६० नवीन पदे निर्माण करण्यात येणार आहेत. या कक्षांतर्गतील सर्व पदे "वित्त व लेखा सेवा" संवर्गातून भरण्यात येणार आहे.

सदर कक्षामुळे आदिवासी उपयोजनेंतर्गत निधीच्या उपयोगितेबाबतचे पर्यवेक्षण सुलभ होऊन विभागाच्या अधिनस्त विविध क्षेत्रिय कार्यालये व शैक्षणिक संस्थांना लेखा विषयक व वित्तीय बाबी हाताळणे विषयक मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळणार आहे. तसेच विभागाचे अंतर्गत लेखापरीक्षण (Internal Audit) व प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन करणे सोईचे होणार असून एकंदरीत आदिवासी उपयोजनेची पारदर्शकपणे, गतीने व परिणामकारक अंमलबजावणी करण्यास मदत होणार आहे.

-----०-----

कृषि विभाग

## मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत ठिबक व तुषार सिंचन संचासाठी ८० टक्के अनुदान

राज्यात राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत ठिबक व तुषार सिंचन संच बसविण्याकरिता आता उर्वरीत १०७ तालुक्यांतील अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांना ८० टक्के अनुदान तसेच इतर शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

यापूर्वी दि. ०९ जुलै, २०१९ च्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्याप्रवण १४ जिल्हे, ३ नक्षलग्रस्त जिल्हे अशा १७ जिल्ह्यामधील सर्व तालुके तसेच उर्वरीत महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण तालुके अशा राज्यातील एकुण २४४ तालुक्यांमध्ये मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ठिबक सिंचन वा तुषार सिंचन संच बसविण्याकरिता प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांना देय असलेल्या ५५ टक्के अनुदानास २५ टक्के पूरक अनुदान देऊन एकुण ८० टक्के अनुदान देण्यात येत आहे. तसेच इतर शेतकऱ्यांना कमाल ५ हेक्टर क्षेत्रासाठी देय ४५ टक्के अनुदानास ३० टक्के पूरक अनुदान देऊन ७५ टक्के अनुदान देण्यात येत आहे. आता या योजनेंतर्गत राज्यातील उर्वरीत १०७ तालुक्यांतील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना देखील ८० टक्के अनुदान देण्याचा तसेच इतर शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदान देण्याचा निर्णय राज्यशासनाने घेतला आहे. तसेच १०७ तालुक्यांमध्ये शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा रु.७५ हजार यापैकी जे कमी असेल ते अनुदान देण्याचा निर्णय राज्यशासनाने केला आहे.

-----०-----

सामान्य प्रशासन विभाग

## औरंगाबाद विमानतळाचे नाव छत्रपती संभाजी महाराज विमानतळ करण्यासाठी केंद्राकडे शिफारस करण्यास मान्यता

औरंगाबाद विमानतळाचे नाव बदलून छत्रपती संभाजी महाराज विमानतळ, औरंगाबाद असे करण्यासाठी केंद्र शासनाकडे शिफारस करण्यास मान्यता देण्यात आली.

औरंगाबाद महानगरपालिकेने देखील -धर्मवीर राजे संभाजी भोसले विमानतळ॰ असे नाव करण्याबाबत ठराव संमत केला आहे. मंत्रिमंडळाने या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता घेऊन केंद्र शासनाच्या नागरी विमान मंत्रालयाकडे हा प्रस्ताव पाठविण्यात येईल.

यापूर्वी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नाव छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई असे करण्यात आले आहे तर कोल्हापूर विमानतळाचे नाव छत्रपती राजाराम महाराज विमानतळ, कोल्हापूर असे करण्यात आले आहे याच धर्तीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

-----०-----

पर्यटन विभाग

## सिंधुदुर्गातील मोचेमाडच्या फोमेंटो रिसॉर्ट ॲण्ड हॉटेलला दिलेल्या मालमत्तेच्या भाडेपट्ट्यात ९० वर्षापर्यंत वाढ

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मोचेमाड आरवली टाक येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने फोमेंटो रिसॉर्ट ॲण्ड हॉटेल लि. यांना भाडेतत्वावर दिलेल्या भाडेपट्ट्याचा कालावधी ९० वर्षांपर्यंत वाढविण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि.११ मार्च २०२०
# (एकूण निर्णय-१)

दि.११ मार्च २०२०

ग्रामविकास विभाग

## ग्रामपंचायत निवडणुकीसाठी उमेदवारांना दिलासा उमेदवारी अर्जासाठी असलेल्या जातपडताळणी प्रमाणपत्राच्या अटीमध्ये सूट

जातवैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे ग्रामपंचायत निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र सादर करु न शकणाऱ्या उमेदवारांना दिलासा मिळाला आहे. आता त्यांना जातपडताळणी समितीकडे जातवैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला तरी निवडणुकीकरीता उमेदवारी अर्ज भरता येणार आहे. या सुटीचा लाभ घेऊन उमेदवारी अर्ज भरलेला संबंधीत उमेदवार निवडून आल्यास पुढील वर्षभरात त्याला जातवैधता प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे.

निवडणुकीत उमेदवारांना उमेदवारी अर्ज भरताना जातपडताळणी प्रमाणपत्र देणे सध्या बंधनकारक आहे. आता संमत झालेल्या या विधेयकानुसार अर्ज भरल्याचे टोकन किंवा सत्य प्रत दाखवली तर उमेदवाराला उमेदवारी अर्ज भरता येईल. यामुळे ग्रामपंचायत निवडणुकीतील इच्छुक उमेदवारांचा निवडणुकीचा हक्क डावलला जाणार नाही.

-----०-----

**मंत्रिमंडळ निर्णय**
**दि.१२ मार्च २०२०**
**(एकूण निर्णय-१)**

दि.१२ मार्च २०२०
गृह विभाग

**मुंबई सेंट्रल टर्मिनसच्या**
**नाना शंकरशेट मुंबई सेंट्रल टर्मिनस नामकरणास मंजुरी**

मुंबईच्या पश्चिम उपनगरीय रेल्वेवरील मुंबई सेंट्रल टर्मिनसला नाना शंकरशेट यांचे नाव देण्याबाबतच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्याबाबत केंद्र शासनाच्या गृह आणि रेल्वे मंत्रालयाकडे प्रस्ताव पाठविण्यासदेखील मंजुरी देण्यात आली.

-----०-----